ॐ

| CREDIT | | | | DEBIT | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| DATE | PARTICULARS | Rs. | P. | DATE | PARTICULARS | Rs. | P. |

ॐ चे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. मनुष्य दुःखाने कण्हू लागला की, तो आवाज ॐ आहे. मनुष्य ऐकत असता जो हुंकार देतो तो ॐ आहे. लहान मुलगा आईला हाक मारताना मा, अम्मा, मम्मा म्हणतो तो ॐ आहे. मुस्लीम लोक प्रार्थनेच्या शेवटी 'आमीन' म्हणतात. ख्रिश्चन लोक 'आमेन' म्हणतात. परमात्म्याला 'ऑम्नीप्रेझेंट' 'ऑम्नीसिएण्ट' 'ऑम्नीपोटेंट' म्हणतात. सर्वव्यापी, सर्वसाक्षी सर्वशक्तिमान ह्या विशेषणातील ऑम्नी हे ॐ चे द्योतक आहे. संस्कृतमधील अहं आणि हिंदीतील हम किंवा मराठीतील आम्ही म्हणजे मुळातील ॐ आहे.

थोडक्यात काय, तर आत्मा म्हणजे मी, किंवा ईश्वर म्हणजे सर्वव्यापी तत्त्व किंवा शुद्ध निर्व्याज प्रेम या सर्वांचे प्रतीक ॐ आहे. ॐ हा ईश्वराचा वाचक किंवा संकेत आहे. ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचीति ज्याला येते तो आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी ॐकाराचा उच्चार करतो. ॐकाराचा उच्चार करून ईश्वराच्या अस्तित्वाची भावना वाढवण्याचा अभ्यास केल्यास आत्मदर्शन निश्चित होईल.